**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २१ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आज दावोस इथं राज्य सरकार ने केले दोन सामंजस्य करार, राज्यात गुंतवणूक आणि रोजगाराला मिळणार चालना.**
2. **दुचाकी स्वारांसाठी उपयुक्त ठरेल, असे फोल्डिंग हेल्मेट नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील संशोधकांनी केले तयार.**
3. **लोकशाहीचे रक्षण आणि मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेसचे २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिनी राज्यभर आंदोलन: काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेयांची माहिती.**
4. **रामटेक इथं उद्या पासून ते 24 जानेवारी दरम्यान तीन दिवस पर्यटन व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन.**

**आता सविस्तर बातम्या** .......

दावोस

दावोस इथे आज राज्य सरकारन दोन सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. पहिल्या सामंजस्य कराराअंतर्गत राज्य सरकार आणि कल्याणी ग्रुप मध्ये संरक्षण आणि पोलाद तसंच इलेक्ट्रिक वाहन या क्षेत्रात सामंजस्य करार झाला असून यात 5,250 कोटींची गुंतवणूक होणार आहे. तसेच यातून 4,000 रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. या सामंजस्य कराराच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कल्याणी ग्रुपचे उपाध्यक्ष अमित कल्याणी यांची उपस्थिती होती. याशिवाय दुसऱ्या सामंजस्य करारा अंतर्गत राज्य सरकार आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यात संरक्षण क्षेत्रात 16 हजार 500 कोटींची गुंतवणूक असलेला करार करण्यात आला असून त्यातून 2,450 रोजगार निर्मिती होणार आहे. या सामंजस्य करारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कडून सतीश शेठ यांची उपस्थिती होती आज एकूण 21 हजार 750 कोटींचे सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक अध्यक्ष क्लॉस श्वाब यांची भेट घेतली. दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन आता सज्ज झाले असून, पुढचे दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे असणार आहेत. महाराष्ट्रासाठी विक्रमी सामंजस्य करार यात होणार आहेत आणि विविध कंपन्यांसोबत बैठकाही होणार आहेत.याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज होरॅसिसचे अध्यक्ष फ्रँक जर्गन रिक्टर यांचीही भेट घेतली. फ्रँक हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे माजी संचालक सुद्धा आहेत.

फोल्डिंग हेल्मेट

दुचाकी स्वारांसाठी उपयुक्त ठरेल, असे फोल्डिंग हेल्मेट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील संशोधकांनी तयार केल आहे. दोघांचीही हेल्मेट दुचाकीमध्ये ठेवता येणारे नाविन्यपूर्ण संशोधन भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे आणि एमएससीची विद्यार्थिनी आदिती देशमुख यांनी केल आहे. या संशोधना बद्दल अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधी कडून.....

***वाहन चालवून झाल्यावर हेल्मेट ठेवायचं कुठे, हा दुचाकी चालकांसमोर मोठा प्रश्न असतो. मात्र येत्या काही दिवसांत हे हेल्मेट दुचाकीच्या डिक्कीमध्ये फोल्ड करून ठेवता येणार आहे. नागपूरचे डॉ. संजय ढोबळे आणि त्यांची विद्यार्थिनी आदिती देशमुख यांनी फोल्डिंग हेल्मेट तंत्रज्ञान विकसित केलं आहे. हे हेल्मेट तयार करताना, त्याची सर्व कार्यपद्धती आणि मजबुती नियमित हेल्मेटप्रमाणे राहील याची काळजी घेण्यात येत आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरातून तयार केलेल्या या फोल्डिंग हेल्मेट साठी डॉ. संजय ढोबळे आणि आदिती देशमुख या दोघांना आंतरराष्ट्रीय पेटंटही मिळालं आहे.***

लोकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत दुचाकीवर एक हेल्मेट ठेवायची व्यवस्था देखील केलेली असते. मात्र, दोघांसाठी देखील हेल्मेट अनिवार्य केले तर जेव्हा वाहन उभे राहील त्यावेळी हेल्मेट कोठे ठेवायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. जेव्हा प्रश्न निर्माण होतात. तेव्हा त्यावर उपाय शोधणे हाच संशोधकांचा विषय होतो.भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ओमप्रकाश चिमणकर यांच्यासह विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी डॉ. संजय ढोबळे आणि आदिती देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.

प्रजासत्ताक दिन तयारी

येत्या रविवारी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या शानदार संचलनाच्या कार्यक्रमात भारताचं सांस्कृतिक वैभव आणि भारतीय सैन्य दलाचं कौशल्य याचं दर्शन घडणार आहे. त्यात सहभागी होणाऱ्या पथकांचा कसून सराव चालू आहे. हवाई दलाच्या हेलिकॉप्टर्सनी आज हवाई कसरतीचा सराव केला.भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त विशेष दोन चित्ररथ यंदाच्या संचलनात सहभागी होणार आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुब्रियांतो हे या संचलनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावर्षीच्या संचलनात इंडोनेशियाच्या १६० सैनिकांची एक तुकडी आणि १९० जणांचं लष्करी बँड पथक सहभागी होणार आहे. तसंच भारतीय राज्यघटनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्या निमित्तानं देशाच्या विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे ३१ चित्ररथ सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमासाठी देशभरातून ३४ विविध क्षेत्रातल्या दहा हजार मान्यवरांना आमंत्रित करण्यात आलं आहे.

खादी महोत्सव

प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीन अमरावती जिल्ह्यातील बस स्टँड समोरील सायन्सकोर मैदान येथे मेळघाट हाट येथे खादी महोत्सवाला सुरवात झाली असून २५ जानेवारीपर्यंत हा महोत्सव चालणार आहे. अमरावतीकरांनी मोठ्या संख्येन खादी महोत्सवाला भेट द्यावी, अस आवाहन खादी आणि ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीन करण्यात आल आहे. उद्योग विभागाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रमातंर्गत सोलर चरखा समुहासाठी सामुहिक सुविधा केंद्र अमरावती एम.आय.डी.सी. क्षेत्रात प्रस्थापित करण्यात आले आहे.

नक्षलवादी

छत्तीसगढ आणि ओडिशाच्या सीमेवर काल रात्री झालेल्या संयुक्त अभियानात १४ नक्षलवादी मारले गेले. कुल्हाडीघाट आरक्षित वन क्षेत्रात मोठ्या संख्येनं नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर छत्तीसगढ आणि ओडिशा पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांनी संयुक्तपणे हे अभियान राबवलं. घटनास्थळावरुन काल रात्री दोन आणि आज सकाळी १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. या कारवाईमुळे नक्षलमुक्त भारत निर्माण करण्याच्या दिशेनं सुरक्षा दलांना मोठं यश मिळालं असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, नक्षलवादाला हा आणखी एक मोठा धक्का असल्याचं नमूद केलं.

चंद्रशेखर बावनकुळे

महसूल विभागात राबवण्यात येत असलेला शंभर दिवसांसाठीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जन सामान्यांना शासनाच्या सेवा अधिक जलद गतीनं उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. महसूल विभागाअंतर्गत शंभर दिवसांत घेण्यात येत असलेले कार्यक्रम, योजनांचा आढावा बावनकुळे यांनी घेतला. नागरिकांना महसूल विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन देण्यासाठी पोर्टलचा अधिकाधिक वापर करावा, यामध्ये जमीन पोर्टल, महाखनिज पोर्टल, आपली चावडी, ई चावडी यासारख्या प्रणालींचा वापर करावा असंही त्यांनी सांगितलं.

नाना पटोले पत्र परिषद

निष्पक्ष आणि  पारदर्शक निवडणुका घेणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य असतानाही सध्या निवडणूक आयोग ज्या पद्धतीने निवडणुका घेत आहे त्यामुळे आयोगाच्या विश्वासार्हततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.  निवडणूक आयोगाच्या या कृत्यांविरोधात आणि  लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेस पक्ष २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनी राज्यभर जिल्हा आणि  तालुका स्तरावर आंदोलन करुन जनजागृती करणार आहे. या आंदोलनात राज्यातील महत्वाचे नेतेही सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. मुंबईच्या टिळक भवनमध्ये पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत घोटाळा झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

***या चार महिन्यामध्ये जे मतदान ५० लाख मत या राज्यामध्ये  वाढवले गेलेत ते मत कशी वाढवली याची माहित निवडणूक आयोग देत नाही आणि त्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रामध्ये या आंदोलन आता आम्ही सुरु करतो आहे.***

बदलापूर फेक एन्काऊंटरचे आदेश मंत्रालय आणि  पोलीस महासंचालक कार्यालयातून कोणी दिले त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

रामटेक महोत्सव

प्रसिद्ध तीर्थस्थळ आणि पर्यटनाचे आकर्षण असलेल्या रामटेक येथे 22 ते 24 जानेवारी दरम्यान होत असलेल्या तीन दिवस पर्यटन आणि सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन बुधवार, 22

जानेवारी रोजी सायंकाळी 6 वाजता रामटेक येथील नेहरू मैदानावर होत आहे. केंद्रीय परिवहन, महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त, नियोजन, कृषी, मदत, पुनर्वसन, विधी आणि न्याय, कामगार राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांची उपस्थिती राहणार आहे. रामटेक पर्यटन आणि सांस्कृतिक महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठेच्या पहिल्या वर्धापन दिनाच्या मुहूर्तावर होत असलेल्या या महोत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्घाटन कार्यक्रमापूर्वी 5.30 वाजता सुप्रसिद्ध भजन गायिका शहनाज अख्तर यांचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी 7 वाजता भव्यदिव्य 'रामायण' हे महानाट्य सादर केले जाणार आहे. या तीन दिवसीय महोत्सवात मुख्य कार्यक्रमांव्यतिरिक्त स्थानिकांसाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, सायकल स्पर्धा, पॅरामोटर, मातीकला स्पर्धा, नौका स्पर्धा, स्केटिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसच, फूड फेस्टिव्हल, हॉट एअर बलून आणि महिला बचत गटाचे स्टॉल प्रदर्शनही राहणार आहे.

हवामान

विदर्भात नागपूर आणि यवतमाळ या दोन जिल्ह्यात सर्वात कमी 12.2 अंश सेल्सियस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. याशिवाय गडचिरोली येथे बारा पूर्णांक चार इतक्या तापमानाची नोंद झाली. अकोला अमरावती वर्धा गोंदिया भंडारा या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 13 ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 32.8 अंश सेल्सियस इतक नोंदवण्यात आलं. आगामी काही दिवस हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला आहे.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, तरुण प्रकाश यांनी काल इतवारी स्थानकाची पाहणी केली आणि या स्थानकावरील चालू पायाभूत सुविधा विकास, रेल्वे प्रकल्प, कामकाज आणि सुरक्षिततेचा व्यापक आढावा घेतला. नागपूर विभागाच्या बैठकीच्या सभागृहात महाव्यवस्थापकांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि सर्व विभागीय अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. यावेळी विविध विकासकामांवर चर्चा करण्यात आली.

*****